# प्रकरण पाचवे

## जे.पी.नाईक यांचे शैक्षणिक विचार

## प्रकरण पाचवे

### डॉ.जे.पी.नाईक यांचे शैक्षणिक विचार --

जे.पी.नाईक हे प्रशासक,प्राध्यापक,नियोजक अशा अनेक भूमिकेतून काम मनापासून करताना दिसतात. पण खरेतर जे.पी.नाईक यांचे आवडते क्षेत्र म्हणजे शिक्षण क्षेत्र. भारतीय जनतेत किंबहुना ग्रामीण परिसरात सुधारणा त्यांना अपेक्षित होत्या. शिक्षणाने मानवी जीवनात परिवर्तन करता येते या विचाराणेच जे.पी.नाईक यांनी खालील दृष्टीने शिक्षणाचा विचार केला आहे.

डॉ.जे.पी.नाईक हे शिक्षण तज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. शिक्षणासंबंधी त्यानी अनेक ग्रंथ लिहिले. अनेक शैक्षणिक आयोगात काम करुन त्याचे आराखडे तयार केले. दि.२३,२४ व २५ ऑगस्ट १९७५ साली पुणे विद्यापीठातर्फे महाराष्ट्र शिक्षणशास्त्र संस्थेत आयोजित केलेल्या टागोर स्मृती व्याख्यान मालेत त्यानी Equality, Quality and Equantity The Elusive Triangle in India Education - या विषयावर व्याख्याने दिली. या व्याख्यानात संकल्पना,आकडेवारी, श्रोत्यांच्या मनात ठसली म्हणून एक फळा हाताशी ठेवला होता.त्याच्या सहाय्याने अखंड ओघ सुरु होई. शिक्षणशास्त्राचा परिचय नसलेल्या व्यक्तिनाही व्याख्यान संपल्यावर आपण जणू काय शिक्षणतज्ज्ञ झालो असे वाटे.[१]

### अस्पृश्यांच्या शिक्षणाचा प्रश्न --

सन १९५६ मध्ये अस्पृश्यांच्या मुलांना शाळेत प्रवेश देण्याचे नाकारलेले होते.इतर सवर्ण हिन्दू आपली मुले शाळेतून काढून घेतील व पर्यायाने शाळा बंद होईल अशी धास्ती त्यावेळी खूपच होती. ती शाळा धारवाडची असली तरी सर्वत्र विचारसरणी तीच बाब होती. परंतु त्या

केचे गव्हर्नर जनरल व ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टर्सनी अस्पृश्यानाही शिक्षणाची दारे खुली केली.शिक्षणासाठी शाळा बंद झाली तरी चालेल पण अस्पृश्यानाही शाळा उपलब्ध असावी असे ठामपणे जाहिर केले. जे.पी.नाईक यांनी त्याचा पाठपुरावा केला.

इ.स.१९२१ पासून भारतीय शिक्षणक्षेत्रात भारतीय कारभारी ( Administrator's ) म्हणून काम करु लागले. त्यानी अव्वल इंग्रजी आमदानातील शैक्षणिक धोरण अधिक उदार करुन तळागाळातील गरीब सामान्य माणसांच्या मुलांच्या शिक्षणासाठी विविध सवलती उपलब्ध करुन दिल्या.इतकेच नव्हे तर तर प्रारंभी ६ ते १० या वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण सुरु केले. पुढे याच वयोगट ६ ते १४ पर्यन्त वाढविला.मागासवर्गीय जाती जमातीच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविले गेले. स्वातंत्र्यानंतर हेच धोरण अधिक उदारतेने व कार्यक्षमतेने राबविण्यात येत होते. यातून शिक्षणास समानता आणण्याचा प्रयत्न केला.

<u>जे.पी.नाईक यांच्या मते शिक्षणाचे उद्दिष्ट</u> -- खालीलप्रमाणे होते --

<u>शिक्षणाची गुणवत्ता --</u>

इ.स.१८१३ पासून देशाला कोणत्या त-हेचे शिक्षण द्यावे याबद्दल दोन तट होते. एकाच्या मते भारतीय लोकांना त्याचीच मूळ शिक्षण पध्दती अनुसरुन शिक्षण द्यावे. दुस-या गटाच्या मते पाश्चात्य विद्या इंग्रजी माध्यमातून द्यावे.लॉर्ड मेकॉले,लॉर्ड विल्यम बेंटिंग व राजाराममोहन रॉय यांनी पाश्चात्य शिक्षणाचा पुरस्कार केला. जे.पी.नाईक यांनाही हेच मातृभाषे बरोबर इंग्रजी ज्ञान मिळणे गरजेचे वाटत होते.

<u>शिक्षण पध्दती आखली --</u>

शिक्षणाची गुणवत्ता ( Quality ) समृध्द करण्यासाठी पैशाचे बळ उभे करावयाचे ते सन १९२१ पर्यन्त उभे न राहिल्यामुळे शिक्षण गुणवत्ता कमी पडू लागली.

माध्यमिक व विद्यापीठ स्तरावर शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असल्यामुळे समानता व गुणवत्ता यामध्ये अंतर पडू लागले म्हणून मातृभाषेच्या माध्यमाचा स्वीकार करणेत आला. जे.पी.नाईक यांच्या मते यामुळे तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणावर अधिक भर देऊन गुणवत्ते बरोबर शिक्षण जीवनाभिमुख होऊन देशाच्या विकास कार्यात वाढ झाली पाहिजे.

जे.पी.नाईक यांच्या मते शिक्षणाचे उद्दिष्ट दुहेरी आहे. व्यक्तीचा सर्वांगीण विकास व समाजाचा सर्वांगीण विकास समाजाचे स्वरुप कालाच्या ओघात सतत बदलत असते.समाजाच्या बदलत जाणाऱ्या गरजा पूर्ण करणेसाठी शिक्षणात बदल आवश्यक आहे हाच विचार त्यानी सन १९६४-६५ साली शिक्षण आयोगास आग्रहपूर्व मांडला.जे.पी.नाईक यांच्या मते आधुनिक जगामध्ये शिक्षणाचे नवीन उद्दिष्ट म्हणजे शिकणारा समाज ( Adeorning society ) प्रत्येक मुलामध्ये ज्ञानाचे कुतूहल जागृत करुन त्याला स्वत:ला अभ्यासाची सवय लावायला हवी,असे झाले तरच तो आजन्म विद्यार्थी बनू शकेल.[२]

शिक्षण तज्ज्ञ शिक्षणाच्या चाकोरीबध्द --

कार्यक्रमाचाच आग्रह धरला त्यामुळे शिक्षण कार्यक्रम बऱ्याच वेळा अपयशी ठरतात.आपल्या देशातील सामान्य माणसाच्या जीवनाविषयक प्राथमिक गरजा किमान पदी पूर्ण झाल्याखेरीज त्याना शिक्षणाचे महत्व पटणे शक्य नसते.त्याचे जीवन मान सुधारावे म्हणून आपले जीवन विषयक हक्क प्रस्थापित करुन घेण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातूनच जागृत करावे लागते. चाकोरी बाहेरील शिक्षणाचा विचार जे.पी.नाईक यांनी ` सम परस्पेक्टी ऑन नॉन फॉर्मल एज्युकेशन ` या ग्रंथात कळकळीने मांडला.

शिक्षण हा विकास योजनेचा एक आधार असतो पण एकमेव आधार बनू शकत नाही हे नाईक जाणत नाहीत.शिक्षण व आरोग्य सेवा यांच्यात संबंध जोडून ऑल्टर नेटिव्हज् इन हेल्थ ही योजना नाईक यांनी आखली.

शिक्षणाच्या मूलगामी परिवर्तनाचे स्वप्न नाईक यांनी आपल्या बरोबर आजन्म बाळगले व हे स्वप्न अधुरे राहिले. ही दु:खद जाणीव त्यांच्या मनाला शेवटच्या क्षणीही होती.[3]

शिक्षण प्राप्तीच्या तीन वाटा जे.पी.नाईक यांनी आपल्या अनौपचारिक शिक्षण का व कसे या पुस्तकात खालील प्रमाणे सांगितल्या आहेत.

शिक्षण प्राप्त होण्याच्या तीन निरनिराळ्या वाटा आहेत. औपचारिक ,अनौपचारिक आणि सहजासहजी होणारे शिक्षण.

सहज शिक्षण हे आपण एखाद्या समाजात लहानाचे मोठे होतो आणि त्या अनुषंगाने आपण आपोआप जे शिकतो ते सहज शिक्षण ते आपले सामाजिकरण म्हणता येईल.

शालेय शिक्षणाच्या चौकटी बाहेर राहून अनौपचारिक शिक्षण घेता येते. अनौपचारिक शिक्षण योजनाबध्द व संघटित केलेले असते ते इंग्लिशमध्ये अनौपचारिक शिक्षण ही संज्ञा ना औपचारिक आणि ना सहज अशा निश्चित अर्थाने वापरली जाते.[4] शैक्षणिक क्रांती करण्याविषयी स्वत: नाईक म्हणतात सर्वाधिकारी झाल्यावर मला शैक्षणिक क्रांती घडवून आणायची होती पण ती नेपोलियनसारखी सक्तीने नाही तर मने वळवून म्हणून मला असे दिसले की माझा ज्याच्यावर अगदी जीव आहे तेच मी करतो आहे पण ते मला अगदी तिरस्कारणीय वाटते अशा मार्गाने[5].

शिक्षण क्षेत्रावर अनोनात प्रेम करणाऱ्या नाईक यांचा जन्मही योगायोगाने शिक्षक दिनीच म्हणजे ५ सप्टेंबर १९०७ ला झालेला होता. ग्रामीण भागाबद्दल त्याना विशेष आत्मियता होती.या ग्रामीण विकासासाठी शिक्षणाची रचना कशी असावी या संदर्भात ग्रामीण विकासाचे मुख्य प्रश्न या चर्चासत्रासाठी डॉ.जे.पी.नाईक यांनी खालील विचार मांडले आहेत --

सन १८१३ ते १९७८ या कालखंडातील भारतातील ग्रामीण विभागातील शिक्षणाच्या सोईची तरतूद आणि विकासाशी शिक्षणाचा असलेला संबंध व ग्रामीण विकास याची दिशा ठरविण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाय सुचविण्यात आले आहेत.

BARR. BALA... SHIVAJI UNIV... KOLHAPUR

` १९व्या शतकाचा कालखंड म्हणजे ग्रामीण स्वयंपूर्णता नष्ट होण्याची शोकांतिका आहे.[६]

१९व्या शतकाच्या अखेरीस भारतीय खेडी गरीब झाली.शहराना महत्व प्राप्त झाले. ग्रामीण जीवनाशी गरिबी वाढविणारा,त्याचे शोषण करणारा आणि त्याला दुय्यम स्थान देणारा हा काळ होता. या काळात विकास होणे शक्य नव्हते.इंग्रजी राज्याने केवळ त्यांच्याशी निगडित क्षेत्राशी फायद्याच्यादृष्टीने विकास योजना राबविल्या. ग्रामीण विकासाकडे दुर्लक्ष झाले.

सन १८१३ ते १९०० या काळात इंग्रजी प्रशासकांनी इंग्रजी शिक्षण पध्दतीचा पाया रचला त्यासाठी भारतीय जनतेशी इंग्रजी भाषेच्या माध्यमास पश्चिमात्य ज्ञान पसरीवणे ही मुख्य उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली. जे.पी.नाईक यांच्या मते शिक्षण पध्दतीचे तीन टप्पे या कालात ठरविले गेले (१) भारतीय भाषातून प्राथमिक पातळीवर लेखन वाचन व हिशोब त्याचप्रमाणे आधुनिक शास्त्रे मानव विकास विषयाचे शिक्षण देण्यात आले (२) माध्यमिक शिक्षणाचा प्रमुख हेतू इंग्रजी भाषा शिकविणे हा होता (३) उच्च शिक्षणाच्या पातळीवर इंग्रजीतून पश्चिमात्य ज्ञानाचा प्रसार करण्यात आला. या पध्दतीत प्रत्येक पातळी पुढच्या पातळीची पूर्व तयारी करत असे.

शिक्षणक्रमाचे स्वरुप साचेबध्द असल्याने देशात पाश्चिमात्य ज्ञान मिळणारे नागरिक तयार करुन त्याचे नागरी विभागात समूह निर्मितीचे हे शिक्षणाचे उद्दिष्ट ठरले.

सन १८५७ मध्ये कलकत्ता,मुंबई आणि मद्रास येथे विद्यापीठे स्थापन करण्यात आली.[७] ग्रामीण भागात प्राथमिक शाळा सुरु झाल्याने गावठी शाळा बंद पडल्या.सरकारी अनुदानाने प्राथमिक व माध्यमिक शाळा उघडता येऊ लागल्या, त्यामुळे ग्रामीण विकासास चालना मिळाली. सन १९०० ते १९४७ या कालखंडात शासकीय आणि राष्ट्रीय संस्थामध्ये ग्रामीण विकासाच्या आणि शिक्षणाच्या क्षेत्रात कार्य करण्याची चुरस निर्माण झाली.[८]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

सन १९०० ते १९४७ या काळात काही प्रमाण लक्ष दिल्या गेलेल्या विभागावर पूर्वी पेक्षा अधिक लक्ष दिले गेले. सन १९४७ ते १९७८ या कालात दिले गेले पण दारिद्र्य,बेकारी,अनारोग्य,अज्ञान या समस्या तशाच राहिल्या.

ग्रामीण शिक्षण म्हणजे नागरी शिक्षणाचा विस्तार असे न मानता स्थानिक परिस्थिती आणि विकास यांच्याशी ग्रामीण शिक्षणाचे समायोजन करावयास हवे हे समायोजन कसे करता येईल याचा विचार करणे निकडीचे आहे. सर्वत्र शिक्षण पध्दती समान असेल तर सर्वांना शिक्षण पध्दतीचा फायदा होईल.

अनौपचारिक शिक्षणावर आतापर्यन्त अवलंबून आपण राहात होतो. ग्रामीण शिक्षणासाठी ही पध्दती अजिबात योग्य नाही असे जे.पी.नाईक याचे मत होते. त्याचा अर्थ ही शहरी शिक्षणास सर्वस्वी उपयोगी आहे. असेही नाही, शहरातील गरिबांनाही शिक्षणाचा फायदा मिळावा म्हणून आणि त्याना ते अर्थपूर्ण व उपयुक्त वाटावे म्हणून सध्याची पध्दत बदलणे अधिक आवश्यक,अटळ आहे. अनौपचारिक शिक्षण पध्दतीचा स्वीकार न केल्याने ग्रामीण विभागात शिक्षणाचा फायदा संपन्न लोकांनाच अधिक प्रमाणात घेता आला. याचमुळे ग्रामीण शाळात अनेक मुले दाखल होत नाहीत.जी दाखल होतात ती मध्येच शाळा सोडून जातात. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिक करण होऊ शकत नाही.औपचारिक पध्दतीचे माध्यमिक शिक्षणही यामुळे उत्पादनविमुख होते. मोठ्याप्रमाणात अनौपचारिक शिक्षणाचा स्वीकार केल्यास वरील सर्व दोष नष्ट होऊन स्थानिक रहिवाश्याचा सहभाग वाढेल.कमी खर्चात आणि प्रभावीपणे शिक्षण देता येईल. शिक्षण आणि विकास यांचा अधिक निकटचा संबंध प्रस्थापित होऊन सध्याच्या परिस्थितीत प्रचंड परिवर्तन घडून येईल.[१]

प्रौढ शिक्षणास ग्रामीण शिक्षणात प्राधान्य देणे आवश्यक आहे असे जे.पी.नाईक सूचवितात. ग्रामीण जीवनाचा सर्वकष आणि त्वरित विकास होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रौढांच्या शिक्षणापासून सुरुवात करावयास हवी. या शिक्षणात केवळ साक्षरता असून चालणार नाही.प्रौढाच्या दैनंदिन अडिअडचणी सोडविण्यास मदत करणारे आणि

त्याच्या मनात वैचारिक संगठन आणि जागृती निर्माण करणारे शिक्षण त्यांना दिले जाते. दारिद्र्य आणि रोगराई या विरुध्दचा लढा म्हणून अनौपचारिक शिक्षणाचे उपक्रम सुरु करावेत व जे.पी.नाईक यांच्या मते योग्य राजकीय आणि विकासात्मक शिक्षणाचा अंतर्भाव या उपक्रमात झाला पाहिजे.

<u>प्राथमिक शिक्षण --</u>

प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करावयाचे असल्यास जे कधीच शाळेत गेले नाहीत किंवा शाळा सोडून बाहेर पडले अशा ९ ते १० आणि ११ ते १४ वयोगटातील मुलांसाठी अनौपचारिक,शिक्षणाचे उपक्रम हाती घेतले पाहिजेत. यापैकी अनेकजण पोटापाण्यासाठी काम करीत असल्याने त्यांच्या सोईच्या वेळी अंशकालिक वर्ग चालवावे लागतील. साधारणपणे दररोज १ ते २ तास हे वर्ग भरविले जावेत. प्रत्येक वर्गात २० पेक्षा कमी जणांची नावे पटावर असावीत. या वर्गासाठी विशेष अभ्यासक्रम तसेच अध्ययन, अध्यापन साहित्य तयार करावे. प्रत्येक विद्यार्थ्यास हे साहित्य पुरवून सुट्यांची संख्या कमी करुन शिकविण्याच्या विशेष पध्दतीचा उपयोग केला जावा. या प्रकारे अशा मुलांना चार वर्षे मुदतीचा प्राथमिक शाळेतील अभ्यासक्रम वर्षा दोन वर्षात पूर्ण करता येईल. याच पध्दतीने इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यन्तचा अभ्यासक्रम १ ते दीड वर्षात पूर्ण करता येईल. [१०]

जे.पी.नाईक यांनी आपल्या उपक्रमाची तीन तत्वे दिलेली आहेत --

१) ६ ते १४ वयोगटातील ग्रामीण भागातील प्रत्येक मुल शक्य असल्यास संपूर्ण वेळ किंवा आवश्यक असल्यास अंश वेळ शाळेत जाईल.

२) अनौपचारिक शिक्षणाच्या वर्गातील वयाने मोठ्या असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्थानिक परिस्थितीवर आधारित आणि विकासाला चालना देणारा सघन अभ्यासक्रम तयार केला जाईल.

३) पूर्ण वेळच्या औपचारिक शिक्षणावर अवलंबून न राहाता उपलब्ध असलेल्या सर्व स्थानिक शैक्षणिक मनुष्यबळाचा आणि सामुग्रीचा

अधिकाधिक उपयोग करुन औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाचा समावेश असलेले उपक्रम सुरु केले जातील.

माध्यमिक शिक्षण अत्यंत कमकुवत असल्याने ते विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश करण्यापुरती पात्रता ते मिळवून देते. ग्रामीण भागात माध्यमिक शिक्षण अनेक प्रश्न निर्माण करते. प्राथमिक शिक्षण घेतलेले विद्यार्थी ग्रामीण जीवनाशी जमवून घेतात.माध्यमिक शिक्षण घेतलेले विद्यार्थी ग्रामीण जीवनाशी समरस होऊ शकत नाहीत. महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही किंवा महाविद्यालयीन शिक्षण घेऊन नोकरी मिळाली नाही तर हा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनतो. शहरी शिक्षणाच्या धर्तीवर चालणारे ग्रामीण माध्यमिक शिक्षण सध्या निरोपयोगी ठरत असल्याने यात सुधारणा करणे हा मुलभूत प्रश्न आहे.[११]

ग्रामीण भागातील माध्यमिक शिक्षण शहरी भागातील माध्यमिक शिक्षणापेक्षा अधिक महाग आणि कमी कार्यक्षम आहे यात जे.पी.नाईक यांनी (१) माध्यमिक शिक्षणात सुधारणा करुन ते ग्रामीण जीवनाशी सुसंवादी असले पाहिजे (२) ग्रामीण भागातील विशेष प्रकारचे अनौपचारिक शिक्षणाचे उपक्रम कार्यान्वित करावयास हवेत. औपचारिक शिक्षण अंशकालिक शिक्षण युवकमंडळे आणि व्यावसायिक शिक्षण असे बहुविध प्रकारचे शिक्षण दिले पाहिजे. प्राथमिक शिक्षण घेतलेल्या विद्यार्थी ग्रामीण जीवनात येणाऱ्या अनेक जबाबदाऱ्या पेलू शकेल असा विश्वास नाईक यांना वाटतो.

<u>पूर्व प्राथमिक</u> --

हे शिक्षण मुख्यत: शहरात आढळून येते. पूर्व प्राथमिक शिक्षण फी देण्याची कुवत असणाऱ्या संपन्न पालकांच्या मुलांना ते मिळू शकते. ग्रामीण भागातील काही शाळा व शहरी भागातील गरिबांच्या काही शाळांना शासन अनुदान देते. काही शाळा स्वत: चालविणे, या वयोगटाच्या जेमतेम ५ टक्के मुलांना याचा फायदा मिळतो. पूर्व प्राथमिक शाळा पूर्णके

प्रशिक्षिक शाळांना परिक्षा उत्तीर्ण असणाऱ्या शिक्षकांनी चालवाव्यात. या प्रकारच्या शिक्षणासाठी प्रत्येक विद्यार्थी मागील होणारा खर्च परवडणारा नसल्याने ग्रामीण विद्यार्थी पैकी काहींनाच याचा फायदा घेता येईल अशा पूर्व प्राथमिक शिक्षणास पर्याय शोधून काढला पाहिजे. ग्रामीण स्त्रियांना पूर्वप्राथमिक शाळेत काम करण्याचे प्रशिक्षण दिल्यास अल्प मानधन घेऊन त्या काम करु शकतील व कमी खर्चात चांगल्या दर्जाचे शिक्षण देता येईल.

श्रीमती ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ यांनी महाराष्ट्रात मोसबाड येथे अंगनवाडीचे प्रायोगिक उपक्रम सुरु केले ते पथपदर्शक ठरऊ शकतील.[१२] असा विश्वास जे.पी.नाईक यांनी व्यक्त केला आहे.

उच्च शिक्षण --

ग्रामीण भागात महाविद्यालये काढण्यास उत्तेजन देऊ नये कारण तेथील महाविद्यालये अधिक खर्चाची आणि अकार्यक्षम असण्याची शक्यता असते. त्या ऐवजी ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना आवश्यक असल्यास वसतिगृहाची सोय असलेल्या माध्यमिक शाळात आणि महाविद्यालयात शिक्षण देणे अधिक उपयुक्त ठरेल. सन १९४९ साली राधाकृष्णन् आयोगाने ग्रामीण भागात विद्यापीठे किंवा विशेष संस्था उघडण्याची शिफारस केली होती. या शिफारसीनुसार स्थापन केलेल्या संस्थानी अपेक्षापूर्ती केली नाही. संसोरा येथील लोकभारती संस्थेने यशस्वी कार्य केले आहे. ग्रामीण विभागात विकासाचे कार्य करु इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांच्या शिक्षणासाठी या सारख्या अनेक संस्था सुरु करणे उपयुक्त ठरेल. याशिवाय महाविद्यालये आणि विद्यापीठाचे विभाग यांना जवळच्या ग्रामीण विभागात विस्तार सेवा उपक्रम चालविण्यास उत्तेजन दिले जावे. पदवीच्या आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाशी या कार्याचा संबंध जोडला पाहिजे. मुंबई विद्यापीठ आणि टाटा इंस्टिटयूट ऑफ सायन्सने हाती घेतलेले ग्रामीण भागातील उपक्रम उद्बोधक आहेत. या उपक्रमात विविधता आणून आणि त्याची व्याप्ती वाढवून अनेक महाविद्यालयांनी त्यात सहभागी व्हावे. यामुळे योग्य दृष्टिकोन असलेले, ग्रामीण विकास रस

घेणारे कार्यकर्ते निर्माण होतील.[१३] असा जे.पी.नाईक यांना विश्वास वाटतो.

ग्रामीण विकासाच्या पुनरुज्जीवनासाठी कृतीसंशोधन हाती घ्यावयास हवे. शैक्षणिक व सामाजिक संस्था आणि शिक्षण तज्ज्ञ यांना हे विशाल कार्यक्षेत्र उपलब्ध आहे. काळाची गरज भागविण्यासाठी संशोधक, राज्य व केन्द्र सरकार यांना विकास कार्यात मदत केली पाहिजे. शिक्षण व उपक्रम दोन उपक्रमांनी एकमेकांना समांतर कार्य न करता एकत्र येऊन एका दिशेने कार्य केले पाहिजे. या विकास कार्यासाठी अनौपचारिक शैक्षणिक उपक्रम चालवावेत असे जे.पी.नाईक यांचे म्हणणे होते.

डॉ.नाईक त्याचा शिक्षण क्षेत्रातील दीर्घ अनुभव त्यांच्यातील कल्पकता व योजकता, शैक्षणिक प्रश्नांचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा व्यापक दृष्टिकोनातून विचार करण्याची त्याची क्षमता, त्याची विशिष्ट लेखनशैली ही वैशिष्ट्ये एखाद्या समितीचा वा आयोगाचा अहवाल तयार करण्यास अत्यंत उपयुक्त ठरते, त्यामुळेच केन्द्रीय शिक्षण खात्याचे सल्लागार कोठारी आयोगाचे सदस्य सचिव, सामाजिक शास्त्रातील संशोधन मंडळाचे ( इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्सेस रिसर्च ) सचिव म्हणून २१ वर्षांच्या त्याच्या दिल्लीतील वास्तव्यामध्ये अनेक समित्यांना मार्गदर्शन करण्यात त्याची लक्षणीय मदत झाली.`[१४]

कोठारी आयोगाचा अहवाल लिहिताना नाईक यांनी सामाजिक व अधिभौतिक परिस्थितीनुसार पुनर्रचनेतील सूचनात बदल करता येईल ती साचेबंद नसतील अशी काळजी घेतली.

कोठारी आयोगाच्या प्रस्तावनेत नाईक म्हणतात` आजच्या परिस्थितीत शैक्षणिक सुधारणाची गरज निकडीची असल्याने आम्ही आमचा अहवाल सुरुवातीस योजलेल्या वेळापत्रकानुसार सादर करीत आहोत, पण त्यामुळे आमच्या संशोधनाच्या व्याप्तीवर आणि आमच्या मांडणीतील यथार्थतेवर मर्यादा पडल्या आहेत. जर आम्हाला अधिक वेळ उपलब्ध झाला असतातर आमचा अहवाल संक्षिप्त व अधिक वाचणीय झाला असता.`[१५]

कोठारी आयोगाचा हा अहवाल ७०० पानांचा असून प्रकाशनानंतर ६ महिन्यात समरी ऑफ रिकमेंडेशन्स ही १४४ पानी पुस्तिका प्रकाशित

करण्यात आली व त्यात केवळ शिफारसी नसून ३० पानाचे ( एज्युकेशन ॲण्ड नॅशनल ऑब्जेक्टिव्हज् ) शिक्षा व राष्ट्रीय उद्दिष्टये प्रकरण जोडून आयोगाने वैशिष्टये त्यात स्पष्टपणे विशद केली ही पुस्तिका प्रसिध्द करण्याची कल्पना जे.पी.नाईक यांचीच होय.

इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च आणि इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च या संस्थाच्या संयुक्त पुरस्काराने एक अभ्यासक्रम स्थापण्यात आला.त्याचा हेतू आरोग्याच्या क्षेत्रात प्रत्यक्ष काम करणारे डॉक्टर विशेषतज्ज्ञ अधिकारी आणि समाजशास्त्रज्ञ यांना एकत्र आणून त्याच्याकडून सध्याच्या आरोग्याचा व आरोग्यपध्दतीचा सामाजिकदृष्ट्या अभ्यास करायचा आणि या अभ्यासावर आधारित भारतीय सर्व लोकांचे आरोग्य इ.स.२००० पर्यन्त सुधारावयाचे या साठी उपाय सुचवावयाचे.

या अभ्यास गटात डॉ.रामलिंगस्वामी याच्या बरोबर भाटिया, आरोळे वानू कोयाजी, देवधर,यासारखे डॉक्टर वैद्यकीय क्षेत्रातले अधिकारी, तसेच प्रा.जे.पी.नाईक ,श्री.आर.कृष्णमूर्ती ,नरोत्तम शहा इत्यादी समाज शास्त्रज्ञही होते ( १९८० )

नाईक यांच्या बद्दल अध्यक्षानी पुढील गौरोद्‌गार काढले --

" प्रा.जे.पी.नाईक यांचे पुरेसे आभार आम्हालाही मानता येणार नाहीत. ते या सर्व कार्यामागील प्रेरक शक्ती होते.यानाच ही कल्पना सुचली आणि त्यानीच ती शेवटपर्यन्त नेली. या अहवालाचा खर्डा त्यानीच तयार करुन संकल्पनसिध्दी केली.[१६]

आरोग्य अहवालात (१) स्वत:च्या मूलभूत हक्कासाठी झगडू शकतील अशा त-हेने दरिद्री,वंचित वर्गांना संघटित करणे (२) आरोग्याच्या सध्याच्या उत्पादन विरोधी ग्राहक निष्ठ पाश्चात्य नमुन्यापासून दूर जाऊन त्याच्या जागी भारतीय मूल्यांवर व परंपरेवर डोळसपणे आधारलेला, जन सामान्याच्या विशेषत: दरिद्री व वंचित वर्गाच्या गरजांवर आधारलेल्या आरोग्य निगेचा व आरोग्यनिगा सेवांचा एक नवा नमुना विकसित करणे.

यासाठी जन आंदोलन उभे करण्यासंबंधी विचार जे.पी.नाईक यांनी मांडले आहेत.

डॉ.जे.पी.नाईक यांनी ग्रामीण स्त्रियांतील विकास कार्य यावर भर देऊन अनेक परिसंवादामध्ये स्त्री-शिक्षणावर भर दिलेला आढळतो.

ग्रामीण शिक्षण जून १९५९ - मौनी विद्यापीठ प्रकाशन या अंकात त्यानी स्त्री शिक्षणाविषयी खालील विचार मांडले आहेत --

ग्रामीण समाजात शिक्षणाचा प्रसार करावयाचा आहे.त्यातील पुरुषांनाही शिक्षणाचे संस्कार मिळालेले नाहीत अशा स्थितीत स्त्री शिक्षणाचे महत्व अधिक वाढते. स्त्री च्या जीवनाशी कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचा निकटचा संबंध येतो. कुटुंबा खेरीज तिला स्वतंत्र अस्तित्व नसते. यामुळे स्त्री चे शिक्षण हे एक प्रकारे साऱ्या कुटुंबाचेच शिक्षण बनत असल्यास नवल नाही.' [१७]

स्त्रीयांची विशेष कार्यक्षेत्र --

स्त्री पुरुषातील नैसर्गिक व व्यक्तिगत भेदांमुळे काही कामे स्त्रिया विशेष उत्तम प्रकारे करु शकतात. पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शिक्षण क्षेत्रात स्त्रीया पुरुषापेक्षा अधिक चांगले कार्य करतात.

स्त्री शिक्षणाची गरज --

स्त्रियांचे परिश्रम व शिक्षण वाया जावे कारण लग्न व संसार हे स्त्री जीवनाचे उद्दिष्टय समजले गेल्यामुळे इतर क्षेत्रात त्या लक्षच देऊ शकत नाहीत. दहा स्त्रियांना शिक्षण दिल्यावर आपल्याला एक शिक्षिका मिळते.' स्त्रियांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर जागृति निर्माण करुन त्याना शिक्षण द्यावे लागेल.' [१८]

शिक्षणाचे काम फार हळूहळू होते म्हणून त्याची सुरुवात शक्य तितक्या लौकर करण्यात आली पाहिजे.ज्या प्रदेशातील या दृष्टीने विशेष प्रयत्न करण्यात आले तेथे चांगले परिणाम दिसून आले.उदा.केरळ मध्ये मुले व मुलीं यांच्या शिक्षणाचे प्रमाण १०० टक्के ते ७९ टक्के असे आहे. हेच प्रमाण बिहार, उत्तर प्रदेश,राजस्थान व मध्यप्रदेश या हिन्दी भाषी प्रदेशात १८ हूनही कमी आहे. सर्वात कमी प्रमाण राजस्थानात असून

तेथे ते ११ टक्के आहे.त्यातही पुन: खेड्यातील स्त्री शिक्षणाचे प्रमाण १००.२ टक्के आहे. यावरुन हा प्रश्न ताबडतोब हाती घेणे निकडीचे आहे.[१९]

स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार होऊ शकत नाही त्यास पुढील समस्या आढळतात --

१) फुरसदीचा अभाव

२) स्त्रियांविषयी पुरुषांची चुकीची मनोवृत्ती

३) सामाजिक प्रतिबंध - पर्दा, लोकभ्रम,जुने संस्कार वगैरे

४) वाजवी पेक्षा अधिक मुले, आरोग्ययुक्त जीवनाचा अभाव, बाळंतपणाच्या सोईचा अभाव इत्यादी.

मुळे स्त्रियांना शिक्षण देण्यात अडचणी येतात यावर उपाय म्हणजे स्त्रियांना फुरसत मिळवून देणे, महत्वाचे आहे. कारण वैदिक काळात स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार खुपच होता. या काळात अनेक विदुषी निर्माण झाल्या. मुलाप्रमाणे मुलींच्या मुंजी होत,जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य होते पण कालांतराने अल्पवयात लग्न पध्दती सुरु होऊन तिला फुरसद मिळणे बंद झाले. लग्नाचे वय वाढविणे हा यावर उपाय आहे.

आपल्याकडे जसजसा यंत्राचा व विज्ञानाचा वापर वाढत जाईल तसतशी आपल्याला स्त्रियांना शिक्षणासाठी फुरसत मिळू लागेल.[२०]

राधा-वाढा-उष्टि काढा हेच स्त्रियांचे जीवित कार्य बनले ,यातून बाहेर पडावयाचे तर आपल्याला अधिक सोपे व सुटसुटीत खाद्य पदार्थ खाण्याची आवड लावून घेणे आवश्यक आहे. आजाऱ्यांची सेवासुश्रुषा ,स्त्रियांवर सोपविली जाते याचाही विचार केला पाहिजे. वाजवी पेक्षा अधिक मुले होऊ नयेत म्हणून संतती नियमन व कुटुंब नियोजन या कल्पनाचा प्रसार खेड्यामध्ये अधिक झाला पाहिजे.

स्त्रियांच्या बाबतीत पुरुषांची चुकीची मनोवृत्ती --

स्त्रियांच्या बाबतीत पुरुषांची जी चुकीची मनोवृत्ती आहे ती बदलल्या शिवाय स्त्रियांमध्ये परिणामकारक काम करता येणार नाही.[२१]

हे काम पुरुषांचे हे काम स्त्रियांचे ' अशी चुकीची श्रमविकासाचीच तत्व समाजात रुढ असल्याने स्त्रीयांवर कामाचा ताण पडतो. संसाराची जबाबदारी संयुक्त असते हे पुरुषांनी मान्य केल्यास स्त्रियांचा विकास घडून येऊ शकेल. स्त्री ही एक उपभोग्य वस्तु किंवा विलासाचे साधन समजली जाते. खेड्यामध्ये ही वृत्ती विशेष प्रमाणावर आढळते. त्यामुळे सुशिक्षित स्त्रिया (कार्यकर्त्या ) खेड्यात जाण्यास तयार होत नाहीत.'
विवेकानंदानी एके ठिकाणी म्हटले आहे' भारतीय स्त्री ही चूल सांभाळणारी व मुले देणारी वस्तु समजली जाते'[२२] या जुनाट दृष्टिकोनात बदल झाला पाहिजे.

घरदार, गुरे-ढोरे, जमिनीजुमला याप्रमाणे स्त्री हाही संपत्तीचा प्रकार मानला जातो. पुरुषांच्या संमतीशिवाय कोठे बाहेर जाता कामा नये, कोणाशी बोलता कामा नये, स्त्रीला स्वातंत्र्य देण्याच्या लायकीची ती नाही ती कुणाची तरी कन्या, पत्नी, असते. स्वतंत्र व्यक्ति म्हणून तिला स्वत:चे मत नाही . पुरुषांपेक्षा ती कमी दर्जाची असते. दुबळी असते. ही जुनाट कल्पना बदलली पाहिजे असे जे.पी.नाईक आग्रहाने मांडतात. शारीरिक दृष्ट्या स्त्रिया धीमेपणाने सहनशीलतेने व पुन: पुन: कराव्याच्या कामामध्ये स्त्रीचे शरीर पुरुषापेक्षा अधिक टिकाव धरते. रंग, अंधत्व, रातअंधळेपणा हे रोग स्त्रीयापेक्षा पुरुषात अधिक आढळतात. त्यामुळे पुरुष श्रेष्ठ आहे असे म्हणता येणार नाही.[२३]

बौध्दिक व मानसिक पातळी दृष्टिने हजारो वर्षांपासून झालेले संस्कार व अनुभवांचा अभाव यामुळे स्त्रिला कमी दर्जाचे लेखन्यात येते पण हे खरे नाही.

मानसिकदृष्टीने पाहिले तर एकमेकांची मने राखण्यासाठी विशिष्ट गुण स्त्री व पुरुष आपल्या अंगी बनविण्याचा प्रयत्न करतात. वास्तविक पाश्चात्य राष्ट्रात स्त्री पुरुषातील भेद नाहीसा होत चालला आहे.

सामाजिक भेदामुळे स्त्री भित्री, कर्तृत्वशून्य, घरकोंबडी व दुबळी बनली त्यामुळे समाजाचा दुबळा बनला. स्त्रियांनी बरोबरीने काम केल्यास समाजाची प्रगती वेगाने होऊ शकली असती.

या सर्वांवर उपाय म्हणजे स्त्रीयांना घराबाहेर पडता आले पाहिजे. बाह्य जगाशी तिचा संबंध आला पाहिजे त्याने आत्मविश्वास निर्माण होईल. पुरुषांनी घरात अधिक लक्ष घालणे आवश्यक आहे. जबाबदारीचा निम्मा वाटा त्याने उचलावा, सर्वच स्त्रियांना पूर्णवेळ काम करणे अपरिहार्य आहे तेव्हा सर्वसामान्य स्त्रियांनी दिवसभराची नोकरीत न घेता अर्धवेळ काम घ्यावे असे काम पुरविण्याची जबाबदारी समाजावर आहे. यासाठी पुरुषांचा चुकीचा दृष्टिकोन बदलण्यासाठी प्रथम पुरुषांनाच योग्य शिक्षण दिले पाहिजे. पुष्कळ वेळा स्त्री हीच स्त्रीची शत्रू बनते आणि समाजाला मिळून व परंपरागत संस्काराच्या दडपणामुळे ती बाहेर पडण्यास व पुरुषांच्या बरोबरीने हक्क घेण्यास तयार होत नाही.[२४]

अशा वेळी आपण पुढे येऊन शिक्षण दिले पाहिजे.

सन १९५८ च्या मे महिन्यात नियुक्त केलेल्या महिला, शिक्षणासंबंधिच्या राष्ट्रीय समितीचे दि नैशनल कमिटी ऑन वुमेन्स एज्युकेशन याचे जे.पी. नाईक हे एक सदस्य होते. सन १९५८ ते जानेवारी १९५९ हा मर्यादित कालावधी होता. एकूण चार बैठका झाल्या पण अहवालात १५ प्रकरणे १९१ पृष्ठे शिफारशीचे १५ वे प्रकरण ३४ पृष्ठे १९५ शिफारशी आणि प्रश्नावली व इतर कागदपत्रे व संलग्न माहिती मिळून पृष्ठे असा एकंदर ३४० पृष्ठांचा अहवाल जे.पी.नाईक यांच्या संचलनाखाली व मार्गदर्शनाखाली सादर करण्यात आला. या अहवालात स्त्री-शिक्षणाचा विचार, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय सर्व दृष्टिकोनातून समग्रपणे झाला. आणि स्त्री शिक्षणाच्या पुढील प्रगतीसाठी जे मार्ग व ज्या योजना सुचविण्यात आल्या त्या उपयुक्त आणि व्यवहार्य अशाच आहेत. पुढील २०-२५ वर्षातील स्त्री शिक्षणाचे धोरण ठरविण्यात व ते कार्यवाहीत आणण्यास हा अहवाल पायाभूत ठरलेला आहे.[२५]

स्त्रियांमधील समाज शिक्षणाचे कार्य आणि समाज विकास मंत्रालय केन्द्रिय समाज कल्याण मंडळ यांच्यातील कामात सुसूत्रता आणण्याचा प्रश्न या संबंधी चर्चा करण्याकरिता भारतीय प्रौढ शिक्षण संघाचे एक खास

परिसंवाद भरविण्याचे असे जे.पी.नाईक यांनी मोनी विद्यापीठात नोव्हेंबर १९५९ मध्ये झालेल्या एका परिसंवादात आग्रहाने मांडले.

ग्रामीण शिक्षण व ग्रामीण विकास या दोन गोष्टी परस्परांना पूरक झाल्या पाहिजेत कारण आपण ग्रामीण शिक्षणातूनच ग्रामीण पुनर्रचना घडवून आणू शकतो आणि ग्रामीण पुनर्रचनेतून ग्रामीण शिक्षणाला चालना देऊ शकतो.

जे.पी.नाईक म्हणतात शिक्षण हे केवळ साधनरुप आहे. शिक्षण योग्य प्रकारचे असेल आणि ते पुरेशा प्रमाणावर उपलब्ध झाले तरच ते विकास घडवून आणते. परंतु या दोन्ही गोष्टी नसतात तेव्हा शिक्षणाचा उलटा परिणाम घडू शकतो. ( शिक्षण आयोगाचा १९६४-६६ ) अहवाल परिच्छेद १.६.[२६]

गांधीजींच्या शिक्षण विषयक कल्पना सांगताना जे.पी.नाईक म्हणतात जीवनाकडे पाहण्याचा गांधीजीचा दृष्टिकोण सावत्मात्क होता त्यामुळे त्यांच्या शिक्षण विषयक कल्पना सामाजिक रचना,आर्थिक विकास राजकीय विचार प्रणाली, नैतिकता इत्यादी अनेक घटकांशी अतिशय निगडित झालेल्या आढळतात. म्हणून गांधीजींच्या शिक्षण विषयक कल्पना समजाऊन घेताना त्याचा संपूर्ण जीवन विषयक दृष्टिकोनही ध्यानात घ्यावा लागेल.[२७]

भारतातील शैक्षणिक सुधारणेचा ऐतिहासिक आढावा घेताना त्याचे तीन कालखंड जे.पी.नाईक यांनी खालील प्रकारे पाडले आहेत --

१) १८१३ ते १९४० - या कालामध्ये पारंपारिक शिक्षणपध्दतीच्या जागी जवळ जवळ पूर्णपणे वसाहतवादी शिक्षण पध्दतीची हळूहळू पण सातत्याने आणि प्रयत्नपूर्वक कार्यवाही करण्याची आधुनिक शिक्षणातील पहिली प्रमुख सुधारणा झाली.

२) १९४० ते १९४७ या कालामध्ये शिक्षण पध्दतीचे नियंत्रण क्रमशः ब्रिटिश शासनाकडून भारतीय व्यक्तीकडे आले. आपल्याला जी राष्ट्रीय शिक्षणपध्दती निर्माण करावयाची होती तिच्यासंबंधी

भारतीयांनी या काळात सतत बरेच चिंतन आणि नव्या कल्पनासंबंधी मर्यादित प्रयोगही केले.

३) १९४७ ते १९७८ लोकांचे जीवन,गरजा आणि आकांक्षा यांच्याशी निगडित होईल अशी राष्ट्रीय शिक्षणपध्दती निर्माण करण्याचा आपण या काळात प्रयत्न केलेला असला तरी अद्याप त्याला फारसे यश आलेले नाही.[२८]

शैक्षणिक सुधारणेमुळे इहवादीकरण,लोकशाहीकरण आणि आधुनिकीकरण या तीन प्रमुख चळवळी प्रवर्तित झाल्या याची माहिती जे.पी. नाईक यानी खालील प्रमाणे दिली आहे.

शिक्षण पध्दतीत ही भूमिका इहवादी घेण्यात आली. शैक्षणिक सुधारणेमुळे ज्या तीन चळवळी सुरु झाल्या त्याची चर्चा पुढीलप्रमाणे जे.पी.नाईक यांनी केली आहे —

अ) इहवादीकरण — आपली परंपरागत शिक्षणपध्दती, मुख्यत: धार्मिक होती परंतु परिस्थितीच्या रेट्यामुळे,नव्या शिक्षणपध्दतीचा इहवादी भूमिका घेणे क्रमप्राप्त ठरले हा निर्णय करणे अर्थातच सोपे नव्हते.भारतात शिक्षणप्रसार व्हावा यासाठी पुढाकार घेतलेल्या ख्रिश्चन धर्मप्रसारकाना शाळाचे धार्मिक स्वरुप कायम राहावे असे वाटत होते. हिंदू किंवा मुसलमान धर्माचे शिक्षण देण्याऐवजी ख्रिश्चन धर्माचे शिक्षण दिले जावे,एवढेच त्याचे म्हणणे होते. परंतु सरकारने केवळ स्वत:च्या सुरक्षितेसाठी,सामाजिक आणि धार्मिक बाबतीत आपण हस्तक्षेप करणार नाही असे येथील लोकांना आश्वासन दिलेले असल्यामुळे ख्रिश्चन धर्मप्रसारकाची सूचना सरकारला गैरसोईची वाटली. त्याच बरोबर हिंदू किवा मुसलमान धर्माच्या अध्यापनाला पाठिंबा द्यायचा सरकार तयार नव्हते.शेवटी अशी तडजोड करण्यात आली की शाळामध्ये जात किवा धर्म याचा विचार न करता सर्व मुलांना प्रवेश देण्यात येईल. सरकारी शाळामधून धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही आणि खाजगी शाळाना मात्र आपण कोणते धार्मिक शिक्षण द्यावे हे ठरविण्याचे स्वातंत्र्य राहिल. आपल्या मुलाने त्या शाळेमध्ये दिले जाणारे विशिष्ट धर्माचे

शिक्षण घेऊ नये असे जर एखाद्या पालकाना वाटत असेल तर आपल्या पाल्याला त्या शाळेत ठेवूनही धार्मिक शिक्षणापासून दूर ठेवण्याचा अधिकार राहिला.यापेक्षा अधिक चांगला पर्याय सापडलेला नसल्यामुळे हा निर्णय अद्याप कायम असून राज्यघटनेत अंतर्भूत करण्यात आलेला आहे.[२९]

या इहवादीकरणाचा हिंदू समाजाच्या दृष्टीने एक चांगला परिणाम घडून आला.पूर्वी वेदाचा आणि संस्कृतचा अभ्यास मुख्यत: द्विज जातीपुरताच मर्यादित असे आता हाअभ्यास हरिजनांसह सर्व जातीना खुला झाला.त्यामुळे कालांतराने या तथाकथित कनिष्ठ जाती संस्कृत ग्रंथाचा आणि धार्मिक वाङ्मयाचा अभ्यास करु लागल्या आणि आता तर त्या हे विषय स्वत: शिकवू लागल्या आहेत. त्याच्यातील काहीजण पुरोहितही झालेले आहेत. ही खरोखरीच एक मोठी समाधानकारक घटना आहे. दुर्दैवाने बदललेल्या आर्थिक सामाजिक परिस्थितमुळे या अध्ययनाची लोकप्रियता घसरत चालली आहे हे अत्यंत खेदजनक आहे. द्विज नसलेल्या जातीमध्ये या अध्ययनाला पुन: चालना मिळणे सांस्कृतिक दृष्टीने आवश्यक आहे. हे अध्ययन निरंतर चालू राहण्यासाठी एखादी सामाजिक चळवळ संघटित करणे हितावह ठरेल.

ब) लोकशाहीकरण – वर निर्देशित केलेल्या प्रमुख शैक्षणिक सुधारणेमुळे दुसरी चळवळ प्रवर्तित झाली ती लोकशाहीकरणाची. औपचारिक शिक्षण घेण्याचा अधिकार फारच थोड्या लोकांना आहे.या गृहीत कृत्यावरच पारंपरिक शिक्षणपध्दती आधारलेली होती.त्यामुळे प्रत्यक्षामध्ये, विशिष्ट सामाजिक आणि आर्थिक दर्जा असलेल्यानाच या शिक्षणपध्दतीत प्रवेश मिळत असे.परंतु नव्या शिक्षणपध्दतीनुसार जात,वर्ण,वंश,लिंग वा धर्म या बाबतीत कोणताही भेदाभेद न मानता शाळा सर्वांना खुल्या झाल्या.हा महत्वाचा विजय मिळविण्यासाठी लोकांना प्रदीर्घ लढा द्यावा लागला.

या संघर्षात प्रथम प्रवेश केला तो मुलींनी.सनातनी लोकमत बिथरेल या भीतीपायी सरकारने सुरुवातीला मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले नाही. परंतु डलहौसीच्या १८५० मधील नि:संदिग्ध आदेशामुळे मुलींच्या शाळांनाही सरकारी मदत मिळू लागली.त्या मुळे प्रथम नागरी भागात आणि नंतर ग्रामीण भागात स्त्री शिक्षणाचा प्रसार होत गेला.

विशेषत: शिक्षिका उपलब्ध झाल्यावर तर या प्रसाराला गती मिळाली. सुरुवातीला वरिष्ठ आणि मध्यम वर्गातील मुलीं शिक्षण घेऊन लागल्या आणि नंतर ते कनिष्ठ वर्गातील मुलींपर्यन्त पोहोचले. सुरुवातीला मुली फक्त प्राथमिक शिक्षण घेऊन लागल्या.आणि बऱ्याच कालांतराने त्यानी माध्यमिक आणि व्यवसाईक शाळा, महाविद्यालये नी विद्यापीठे यात प्रवेश केला. मुलींमधील शिक्षणप्रसारामुळे विवाह वयोमर्यादा वाढली. त्याचा सामाजिक दर्जा सुधारला.आणि या सुधारण्यामुळे आपोआपच स्त्री शिक्षणाच्या प्रसाराची गती वाढली. अनुसूचित जातीना किवा तथाकथित अस्पृश्यांना अधिक अवघड लढाई अंगीकारावी लागली. शाळेत अनुसूचित जातीच्या मुलांना प्रवेश दिला तर सवर्णहिंदू त्या शाळेवर बहिष्कार टाकतील. या भितीपायी सुरुवातीला अनुसूचित जमातीच्या मुलांना प्रवेश दिला जात नसे. नंतर कोणत्याही अनुसूचित जातीला प्रवेश नाकरता कामा नये असा दृढ निर्णय करण्यात आला. या निर्णयाचा योग्य तो परिणाम दिसून येऊ लागला. कुरकुरत का होईना,पण अनुसूचित जातीतील मुलांच्या शाळाप्रवेशाला मान्यता देण्यात आली.तरीही अस्पृश्यता राहिलेलीच होती. आणि शाळा जेव्हा देवळात भरत असे,तेव्हा त्या ईमारतीच्या आत अनुसूचित जातीच्या मुलांना येऊ दिले जात नसे. एक वेगळा म्हणून त्याच्याकडे पाहिले जाई. आणि इतर मुलांमध्ये मिसळण्याची वा स्पर्श करण्याची त्यांना मुभा नसे या अशा अडचणी असतानाही,अनुसूचित जाती मध्ये बराच शिक्षण प्रसार झालेला आहे. लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेचा आणखी एक परिणाम असा झाला की सामाजिक उच्च नीच श्रेणीमध्ये ज्या गटाना कनिष्ठ स्थान होते त्या सर्व गटापर्यन्त शिक्षण,झिरपत गेले सुरुवातीला प्रत्यक्षामध्ये शिक्षण वरिष्ठ जाती पुरतेच मर्यादित होते. परंतु जेव्हा त्यांच्यापेक्षा खालच्या जातीमधील व्यक्ती शिक्षण घेऊ लागल्या आणि त्याना शिक्षणाचा लाभ होऊ लागला तेव्हा या व्यक्तीनी आपल्या जातीमध्ये अधिक शिक्षण प्रसार व्हावा यासाठी चळवळ सुरु केली.जेव्हा या चळवळीला बऱ्यापैकी यश लाभले तेव्हा त्यापेक्षा कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातीमध्ये या चळवळीला प्रारंभ झाला. अशारीतीने

ही चळवळ सर्व समाज गटापर्यन्त पोहोचली.त्याच प्रमाणे सुरुवातीला हिंदू समाजापुरत्याच मर्यादित राहिलेल्या या आंदोलनाना मुसलमान समाजाणेही स्वीकार केला. प्रगत हिंदू जाती,मुसलमान आणि मागास हिंदू जाती अशी १९०० पर्यन्त शिक्षण शिक्षण प्रसाराची श्रेणी होती.

लोकशाही करणाची ही प्रक्रिया अत्यंत मर्यादित होती.हेही येथे ध्यानात घेतले पाहिजे. शिक्षण घेणे हे प्रत्येक मुलांचा हक्क आहे हे या प्रक्रियेने मान्य केले नव्हते. या प्रक्रियेमध्ये निरक्षरता निर्मुलनाचा किवा सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा कार्यक्रम अंतर्भूत करण्यात आलेला नव्हता. विद्यार्थ्यांचे स्वच्छेने अधिकाधिक सख्येमध्ये शाळेत यावे यासाठी देखिल निर्धार - पूर्वक प्रयत्न करण्यात आला नाही. या उणिवा असूनही जात,धर्म, लिंग, वर्ण किंवा रंग असा भेदाभेद न करता सर्व मुलांना शाळामध्ये प्रवेश देण्याचा निर्णय लोकशाहीकरणाच्यादृष्टीने एक महत्वाचे पाऊल ठरले आणि त्यादृष्टीनि त्याचे स्वागत केले पाहिजे.

क) <u>आधुनिकीकरण</u> --

शैक्षणिक सुधारणेने तिसरी चळवळ प्रवीतित केली.ती अधुनिकीकरणाची भारतीयाचा बाहेरच्या जगाशी संबंध तुटलेला होता आणि त्यामुळे त्याचा विकास खंडित झालेला होता.इंग्रजी भाषेमुळे जग दृष्टीपथात आले आणि आपण नि बाहेरचे जग याच्यात तुलना करणे शक्य झाले.त्या योगे भारतीय समाजाला नवी चेतना लाभली.आणि तिचे परिणीती सांस्कृतिक प्रबोधनात आणि अनेक सामाजिक सुधारणामध्ये झाली.गोखले यानी म्हटल्याप्रमाणे `इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांची मने जुनाट कल्पनाच्या जंजाळातून मुक्त झाली` हे प्रबोधन हळूहळू जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये पसरले आणि भारतीय भाषा नि वाङ्मय यांना नवा बहर आला.

अशाप्रकारे मानवी जीवनाला स्पर्श करुन जाणारा व मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास कसा व्हावा या दृष्टीने स्त्री-पुरुष समाजाच्या दृष्टीनि जे.पी.नाईक यांनी शिक्षणाच्या संदर्भात विचार केलेला आहे.

आजही त्याच्या मार्गदर्शक तत्वाचा,अहवालांचा व त्याच्या मताचा भारतीय शिक्षणाच्या संदर्भात मार्गदर्शन होत आहे.

राष्ट्रीय शिक्षणाच्या सर्व संकल्पनाकडे आणि कार्यक्रमाकडे आपण नव्या आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. यासाठी त्यानी काही सूचना दिल्या आहेत.

शिक्षण व समाज सुधारणा आणि राजकारण या विविध आघाड्यावर करावयाच्या परिवर्तनासाठी प्रयत्नांची दिशा जे.पी.नाईक यांनी खालील रूपरेखा दिली आहे.

१) शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाशी निगडित असलेले मूलभूत राजकीय प्रश्न शिक्षण व्यवस्थेतील कार्यकर्त्यांना समजावून सांगितले पाहिजेत. तसेच त्याची संघटना करुन शैक्षणिक परिवर्तन घडवून आणण्याबाबत त्याना मदत केली पाहिजे.

२) सामाजिक आणि विधायक कार्यकर्त्यांना त्याच्या कार्याचे राजकीय परिणाम समजावून सांगितले पाहिजेत. लोकांमध्ये जाणीवपूर्वक जागृती करण्याचे अंतिम उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या कार्यक्रमाचा उपयोग कसा करता येईल याचे त्याना प्रशिक्षण द्यावयास हवे कारण लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आणि आपल्या हक्काची त्याना जाणीव होते हाच या परिवर्तनाचा मूलभूत हेतू आहे.

३) राजकीय संघटनेला कोणती सांस्कृतिक आणि शैक्षणिक परिमाने असतात याची ब-याच राजकीय कार्यकर्त्यांना माहिती नसते म्हणून त्याना या परिमाणाची माहिती करुन देऊन आपल्या राजकीय कार्यक्रमात या परिमानांना योग्य ते स्थान द्यावे यासाठी त्याना सहाय्य केले पाहिजे.

या त्रिसूत्री कार्यक्रमाचे ध्येय देखिल समग्र परिवर्तनासाठी आवश्यक असे व्यापक,प्रभावी,आणि गतिशील आंदोलन उभारणे हेच आहे.[३०]

गोखले अर्थशास्त्र संस्था पुणे येथे ५ मे १९७४ रोजी काळे स्मारक व्याख्यानामध्ये प्रा.जे.पी.नाईक यांनी राष्ट्रीय शिक्षणाच्या संदर्भात खालील सूचना दिल्या आहेत --

या संबंधात १९०६ आणि १९४७ च्या दरम्यान बरेच विचारमंथन झालेले आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर नेमण्यात आलेल्या अगणित समित्यानी आणि आयोगानी जवळजवळ सतत शैक्षणिक कल्पनाचे वर्णन केलेले असले, तरी या संबंधिच्या विचारातील मूलभूत आशय तोच राहिलेला आहे. शिक्षण पध्दतीमधील सुधारणामध्ये नव्या कल्पनाचा प्रवेश (१)सघन संशोधन आणि(२) प्रयोग नि शोध या दोन मार्गानी होत असतो यापैकी पहिला मार्ग आपल्या देशात अद्याप बाल्यावस्थेत आहे आणि दुसरा मार्ग तर अस्तित्वातच आलेला नाही. शिक्षण आयोगाचा (१९६४-६६ ) अहवाल हा या दिशेने करण्यात आलेला सर्वात चांगला प्रयत्न म्हटला पाहिजे. इतक्या वर्षानंतर या अहवालातील उणीवाही कळून येतात. शिवाय तो आता कालबाह्यही झालेला आहे त्यामुळे जेव्हा आपण राष्ट्रीय शिक्षण पध्दतीसंबंधी बोलतो तेव्हा आपण जुन्या संकल्पना आणि कल्पना याचाच पुनरुच्चार करीत असतो. याचा अर्थ हा की गेल्या सत्तर वर्षातील घटनापासून आपण काहीच शिकलेलो नाही. परिस्थिती अशीच राहिली तर आपले उद्दिष्ट कधीच साध्य होणार नाही. शिक्षण आयोगाने म्हटले आहे. झपाटयाने बदलत असलेल्या आजच्या जगामध्ये एक गोष्ट निश्चित आहे ती ही की कालची शिक्षणपध्दती आजच्या गरजा भागवू शकत नाही. आणि उद्याच्या गरजा तर मुळीच भागवू शकणार नाही म्हणून गेल्या सत्तर वर्षातील आपला सर्व अनुभव आणि या विषयासंबंधी भारतात आणि जगात अलीकडे झालेले चिंतन ध्यानात घेऊन राष्ट्रीय शिक्षण पध्दतीचा नवा आराखडा तयार केल्याशिवाय गत्यंतर राहिलेले नाही.

योजना तयार करणे हे निश्चितच महत्वाचे आहे. परंतु चांगले नियोजक, पण वाईट कार्यवाहक असा लौकिक संपादन केलेल्या लोकांना हे कार्य मुळीच अवघड वाटणार नाही. म्हणून आपल्याला भर द्यावयाचा आहे तो कार्यवाहीवर आणि कार्यवाहीतील प्रक्रियेप्रमाणे बदल घटकाकडेही नीट लक्ष दिले पाहिजे. बदलाच्या प्रक्रियेसंबंधी जे.पी.नाईक यानी तीन मुद्दे खालीलप्रमाणे मांडलेत —

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

१) शिक्षण ही समाजाची एक उपपध्दती असते आणि त्यामुळे शैक्षणिक नि सामाजिक बदल एकाचवेळी घडून याव्यास हवेत दुर्दैवाने,सध्याच्या समाज रचनेमध्येही शैक्षणिक पध्दतीत मुलगामी परिवर्तन घडून आणता येईल आणि या शैक्षणिक परिवर्तनामुळे आपल्याला अभिप्रेत असलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला चालना मिळेल असे आपण आजवर मानीत आलो आहोत. ही समजूत चुकीची आहे हे आता आपल्याला अनुभवावरुन कळून आलेले आहे. प्रस्थापित सामाजिक, आर्थिक आणि राजकीय शक्ती त्यांना नकोश्या वाटणाऱ्या शैक्षणिक परिवर्तनाला विरोध करतात आणि हे परिवर्तन थोपविण्यात किंवा त्याची गती मंदावण्यात त्याना यश येते. म्हणून परस्परांना पूरक आणि साहाय्य भूत ठरणारे सामाजिक आणि शैक्षणिक परिवर्तन एकाच वेळी घडवून आणण्याचा आपण प्रयत्न केला तरच आपल्याला अपेक्षित परिणाम दिसून येईल हे मान्य करायाला हवे.

२) त्याचप्रमाणे,शैक्षणिक क्षेत्रामधून आणि बाहेरुनही एकाच वेळी परिवर्तनाला अनुकूल असा दबाव आणला तर शैक्षणिक बदल चांगल्यारितीने घडवून आणता येईल.म्हणून आपण शैक्षणिक पध्दती बाहेरची प्रचंड शैक्षणिक कार्यक्रम संघटित केले पाहिजेत. आणि त्याचवेळी शिक्षणपध्दतीमधील सर्व पुरोगामी शक्तींना प्रयोग आणि शोध करण्यासाठी उद्युक्त केले पाहिजे. प्रोत्साहन दिले पाहिजे आणि सहाय्यकही केले पाहिजे.

३) शिक्षणात मुलगामी परिवर्तन घडवून आणले पाहिजे अशी मागणी करणारी प्रभावी राष्ट्रीय चळवळ सुरु झाली की हे परिवर्तन घडवून आणणे सुलभ जाते. अशी चळवळ लोकांमध्ये आणि कार्यकर्त्यामध्ये सुयोग्य जाणिव उचित वातावरण आणि आवश्यक निष्ठा वाढवते. खरे म्हणजे अशी पूरक चळवळ सुरु केल्याशिवाय शैक्षणिक परिवर्तनाचा व्यापक कार्यक्रम अंमलात आणण्याचा विचारच करता येणार नाही.ऑक्टोबर-डिसेंबर १९८१,जानेवारी मार्च १९८२ भारतासारख्या विशाल आकाराच्या आणि अगणित जटिल प्रश्नानी ठाण मांडलेल्या देशात सुधारणा आंदोलनाची व्याप्ती हा शैक्षणिक परिवर्तनाच्या दृष्टीने महत्वाचा घटक ठरतो.[३२]

या घटकाकडे पुरेसे लक्ष न देण्यात आल्यामुळे,मुलभूत परिवर्तनासाठी

यापूर्वी करण्यात आलेला प्रयत्न असफल झाला होता.भावी काळात आपण या चुका करता कामा नये.

परिवर्तनाच्या घटकांसंबंधी आपण आपल्या जुन्या समजुतीचे फेर मुल्यमापन केले पाहिजे. स्वातंत्र्यपूर्वकाळात सहाजिकच अशासकीय प्रयत्नावर मुख्यत: भर असे. त्याकाळात शासकीय पाठिंबा मिळण्याची शक्यता नसल्यामुळे शासनावर फारसे अवलंबून राहाण्यात येत नसे.उलट पदरी,स्वातंत्र्य प्राप्तीनंतर केन्द्र आणि राज्य सरकारे आणि नोकर शाही यांच्यावरच अवलंबून राहायाची प्रवृत्ती बळावली आहे. जे काही करायचे असेल ते सरकारने केले पाहिजे असे माणले जात आहे. शिक्षण आयोगाने (१९६४-६६) असे सुचविले होते की केन्द्र आणि राज्य सरकारने अवश्यक तो पुढाकार घेतला आणि साहाय्य केले तर शिक्षक आणि विद्यार्थी शिक्षण पध्दतीमध्ये आवश्यक ते कार्यात्मक बदल घडवून आणू शकतील परंतु ही अपेक्षा पुरी झाली नाही.कारण केन्द्र आणि राज्यसरकारनी जुनीच भूमिका घेतली. आणि वरिष्ठ नि मध्यम वर्गीयांच्या हितसंबंधाची जपणूक केली.कारण राज्यकर्ते या वर्गाचेच प्रतिनिधित्व करित होते. शिक्षक आणि विद्यार्थी यांनीही वर्गीय पक्षपात दाखविला. आपल्या हीतसंबंधावर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या आणि वंचित समाज घटकांना सहाय्यभूत ठरणाऱ्या मुलभूत शैक्षणिक परिवर्तनाचा त्यानी हिरहिरीने पुरस्कार केला नाही. त्यामुळे शैक्षणिक परिवर्तनाच्या कार्यक्रमामध्ये लोकांना आत्मीयता पूर्वक सहभागी करुन घेतल्याशिवाय आणि आर्थिक, सामाजिक बदल घडवून आणू इच्छिणाऱ्या देशव्यापी आंदोलनाचा या कार्यक्रमाला पाठिंबा लाभल्याशिवाय आपल्याला अभिप्रेत असलेले मुलगामी शैक्षणिक परिवर्तन घडून येणार नाही हे स्पष्ट आहे. याचाच अर्थ असा की सामाजिक राजकीय कार्यकर्ते आणि शैक्षणिक कार्यकर्ते यांना आपल्या कार्यामध्ये सुसूत्रता आणावी लागेल.आपले कार्य शैक्षणिक पुर्नघटनेच्या कार्यक्रमाशी निगडित केले पाहिजे.अशी जाणिव सामाजिक ,राजकीय कार्यकर्त्यांमध्ये निर्माण करायला हवी.त्याचप्रमाणे शैक्षणिक कार्यकर्त्यांनी आपल्या कार्यक्रमाचे सामाजिक ,आर्थिक आणि राजकीय परिणाम जाणून घेतले पाहिजे.

शिक्षण विषयक नवे राष्ट्रीय धोरण ठरविण्यासाठी आपण तर मोठ्याप्रमाणावर राष्ट्रीय पातळीवरुन प्रयत्न केला आणि वर निर्देशित केलेल्या पध्दतीने अव्याहत,आणि निर्धारपूर्वक कार्यवाहीत आणला तर येत्या १०एक वर्षामध्ये किंवा किमान पदरी या शतकाच्या अखेरीपर्यन्त आपण राष्ट्रीय शिक्षणाची चांगली पध्दत निर्माण करु शकू यात मुळीच शंका नाही. आपण तसे करु शकलो तरीही, शंभरवर्षात (१८००-१९०० ) निर्माण झालेली वसाहतवादी शिक्षणपध्दती नाहीसी करण्यासाठी आपल्याला १०० वर्षे (१९००-२००० ) लागली असेच म्हणावे लागेल.

## संदर्भ ग्रंथ सूची


१ प्रा.बोधनी प्रवा.(उपप्राचार्य)- टिळक शिक्षण महाविद्यालय - नियतकालिक - १९८१-८२ - पृ.८

२ प्रा.प्र.ब.बोधनी - टिळक शिक्षण महाविद्यालय - नियतकालिक - १९८१-८२-पृ.९

३ संपादक लेख - सकाळ - सोमवार - ३१ ऑगस्ट,१९८१

४ नाईक जे.पी.- अनौपचारिक शिक्षण का व कसे - पृ.२

५ नाईक जे.पी.- साधना शनिवार - १९-९- ८१- अनुवाद अ.के.भागवत अंक पुणे- पृ.१२

६ नाईक चित्रा -(जे.पी.नाईक) - ऑक्टोबर - डिसेंबर १९८१-जानेवारी-मार्च १९८२ पृ.३१

७ नाईक जे.पी.-संपा.चित्रा नाईक - शिक्षण आणि समाज - ऑक्टोबर-डिसें.८१ जानेवारी-मार्च १९८२- पृ.३२

८ किल्ता - पृ.३३

९ जे.पी.नाईक - संपा.(चित्रा नाईक ) शिक्षण आणि समाज - ऑक्टोबर-नोव्हेंबर १९८१,जानेवारी-मार्च-१९८२-पृ.३७

१० नाईक जे.पी.-संपा.(चित्रा नाईक ) शिक्षण आणि समाज - ऑक्टोबर-डिसेंबर १९८१,जानेवारी-मार्च १९८२- पृ.३७

११ नाईक जे.पी.-संपा.(चित्रा नाईक ) शिक्षण आणि समाज - ऑक्टोबर-डिसेंबर १९८१,जानेवारी-मार्च-१९८२- पृ.३७

१२ नाईक जे.पी.-संपा.(चित्रा नाईक ) शिक्षण आणि समाज - ऑक्टोबर-डिसेंबर १९८१,जानेवारी-मार्च १९८२ - पृ.३८

१३ जे.पी.नाईक - संपा.(चित्रा नाईक ) शिक्षण आणि समाज ऑक्टोबर-डिसेंबर १९८१,जानेवारी-मार्च १९८२- पृ.३८

१४ पार्णंदीकर सुलभा - संपा.चित्रा नाईक - शिक्षण आणि समाज ऑक्टोबर-डिसेंबर १९८१,जानेवारी-मार्च १९८२- पृ.२२

१५ पार्णंदीकर सुलभा - संपा.चित्रा नाईक - शिक्षण आणि समाज ऑक्टोबर-डिसेंबर १९८१,जानेवारी-मार्च १९८२,पृ.२३,२४.

१६ मागवत अ.के.संपा.-चित्रा नाईक - शिक्षण आणि समाज
ऑक्टोबर-डिसेंबर १९८१,जानेवारी-मार्च १९८२- पृ.२७
१७ नाईक जे.पी.- ग्रामीण शिक्षण - जून १९५९- पृ.३१
१८ नाईक जे.पी.- ग्रामीण शिक्षण - जून १९५९,पृ.३२
१९ नाईक जे.पी.- ग्रामीण शिक्षण - जून १९५९,पृ.३३
२० नाईक जे.पी. - ग्रामीण शिक्षण - जून १९५९,पृ.३५
२१ नाईक जे.पी. - ग्रामीण शिक्षण - जून १९५९,पृ.३६
२२ नाईक जे.पी. - ग्रामीण शिक्षण - जून १९५९,पृ.३७
२३ नाईक जे.पी. - ग्रामीण शिक्षण - जून १९५९,पृ.३८
२४ नाईक जे.पी. - ग्रामीण शिक्षण - जून १९५९,पृ.३८
२५ नाईक जे.पी. ग्रामीण शिक्षण - जून १९५९,पृ.४१
२६ पाणंदीकर सुलभा - संपा.चित्रा नाईक - शिक्षण आणि समाज
ऑक्टोबर-डिसेंबर १९८१,जानेवारी - मार्च,१९८२- पृ.२२
२७ नाईक जे.पी.संपा.चित्रा नाईक - शिक्षण आणि समाज
ऑक्टोबर-डिसेंबर १९८१,जानेवारी -मार्च १९८२,पृ.७४
२८ नाईक जे.पी.संपा.चित्रा नाईक - शिक्षण आणि समाज -
ऑक्टोबर-डिसेंबर - १९८१,जानेवारी-मार्च १९८२,पृ.३९
२९ नाईक जे.पी.संपा.-चित्रा नाईक - शिक्षण आणि समाज -
ऑक्टोबर-डिसेंबर १९८१,जानेवारी-मार्च १९८२,पृ.४०
३० नाईक जे.पी.संपा.चित्रा नाईक - शिक्षण आणि समाज -
ऑक्टोबर-डिसेंबर १९८१,जानेवारी-मार्च-१९८२,पृ.४१
३१ जे.पी.नाईक - संपा.चित्रा नाईक - शिक्षण आणि समाज -
ऑक्टोबर-डिसेंबर १९८१,जानेवारी-मार्च १९८२,पृ.२०
३२ जे.पी.नाईक - संपा.चित्रा नाईक - शिक्षण आणि समाज -
ऑक्टोबर-डिसेंबर १९८१,जानेवारी-मार्च १९८२,पृ.४७.